**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ४५५/२०१९**
**शासन वि. गणपत मऱ्या राणे.**
**नि.क्र. ९**

**रोहा येथील प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा जिल्हा रायगड यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी एस्. डी. कमलाकर)**

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २१ अन्वये आरोपीचे प्रतिकथन

| | | |
|---|---|---|
| १ | **गुन्हा घडल्याची तारीख** | ०१.०७.२०१९ |
| २ | **प्रथम महिती अहवाल दाखल केल्याचा दिनांक** | ०६.०७.२०१९ |
| ३ | **पोलीस ठाणे गुन्हा क्रमांक** | नागोठणे ४५/२०१९ |
| ४ | **प्रथम महिती अहवाल देणार** | श्री. परेश लक्ष्मण मोरे, पो.ना.ब.क्र.१२८९ नागोठणे पोलीस ठाणे. |
| ५ | **आरोपीचे नाव, वय व पत्ता** | गणपत मऱ्या राणे, वय ५२ वर्षे, रा. पाटणसई आदिवासीवाडी, पो. पाटणसई, ता. रोहा, जि. रायगड. |

६ **गुन्हयाचा तपशील**

तुम्ही दिनांक ०१.०७.२०१९ रोजी संध्याकाळी १९.३० वा. चे सुमारास मौजे बाळसई, वाकण–आमडोशी रोडवर, ता. रोहा येथे तुमच्या ताब्यातील होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम एच ०६ बी वाय ९१४२ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालविली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **२७९** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून समोरून चालत जाणारे इसम श्री. अनंत नारायण जाधव याला पाठीमागून ठोकर मारून त्याला गंभीर स्वरुपाच्या

दुखापती पोहचविल्या व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड विधानाच्या कलम **३३८** अन्वये गुन्हा केला आहे.

याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या ताब्यातील उपरोक्त वाहन हयगयीने व सार्वजनीक जीवित धोक्यात येईल अशा रितीने तसेच रस्त्याच्या परिस्थितीकडे व वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन चालविले व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम **१८४** अन्वये गुन्हा केला आहे.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त गुन्हयाचा तपशील आरोपीस मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

७ आरोपीचे प्रतिकथन

१. तुम्हाला आरोपपत्र व संपूर्ण कागदपत्रांच्या नकला मिळाल्या आहेत काय?

उत्तर– होय.

२. तुम्हाला समजावून सांगीतलेला उपरोक्त गुन्हयाचा तपशील समजला आहे काय?

उत्तर– होय.

३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर– नाही.

दिनांक – १२–०२–२०२०

––स्वाक्षरी––

आरोपीची सही

(स. दि. कमलाकर)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.